# सारस्वत वाणी

२०२३-२४



॥ संहतिः कार्यसाधिका ॥

# सारस्वत समाज विकास मंडळ

## सांगली



खाजगी वितरणासाठी

# सारस्वत वाणी

## अहवाल
## सन २०२३-२४
## वर्ष १



संपादक
श्री मंगेश मंत्री

संपादक
श्री मंगेश मंत्री

मुखपृष्ठ व अक्षरजुळवणी
श्री विनायक राजाध्यक्ष

प्रकाशन स्थळ
सांगली

प्रकाशक
सारस्वत समाज विकास मंडळ,
सांगली

रजि नं
६०२४/९७ व एफ/५९८७

## संपादकीय

सप्रेम नमस्कार,

सारस्वत समाज विकास मंडळ ही संस्था १९९७ साली धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणी केली, पण सारस्वत समाजाचा सांगली, इस्लामपूर, बागणी, डिग्रज, खेड आदी गावातील प्रवास दीर्घकाळाचा आहे. नुसता प्रवास नव्हे, तर सारस्वत व्यक्तींनी अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. सारस्वत समाजाचे संघटन, समारंभ, एकत्रीकरण अनेक वर्षाचे आहे. हा प्रवास थोडाफार जाणून घेऊन सौ. अरुणा साखवळकर यांनी याच अंकात त्याचा अल्प आढावा घेतला आहे. या पलीकडे जाऊन ही अनेकांनी मोठे काम व नाव मिळवले आहे. आपले सण, उत्सव, देव, चालीरीती, खाद्य संस्कृती यासाठी निरंतर काम केले आहे. दरवर्षी अहवाल प्रसिद्ध करताना या संदर्भात काही माहिती घ्यावी, समाज बांधवांचे विचार प्रसिद्ध करावेत, या हेतूने 'सारस्वत वाणी' हा उपक्रम विद्यमान कार्यकारिणीने हाती घेतला व तो मूर्त स्वरूपात तुमच्या हाती देताना संपादक म्हणून मला आनंद होत आहे. संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन याचा विकास, वेग, उपयुक्तता झपाट्याने वाढत आहे. सर्वच क्षेत्रात नवे तंत्रज्ञान रुळले आहे. अशावेळी अनेक गोष्टी कालबाह्य होत आहे. नवे ज्ञान, तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे झाले आहे. आपण समाज म्हणून अग्रेसर राहिले पाहिजेत जोडीला आपली नवी पिढी नवी कौशल्य व आपल्या परंपरा, संस्कार, चालीरिती सांभाळून सर्व क्षेत्रात आघाडीवर कशी राहील यासाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेच. 'संघटन मे शक्ती है', हे खरेच पण संघटन हे सातत्यपूर्ण आणि योग्य दिशेने प्रवाही हवे. सांगलीत आता नव्या दमाने, नवी उद्दिष्टे घेऊन दमदार पावले टाकली जात आहेत. सांगली जिल्हा व शेजारचा सीमा भाग त्यात सहभागी केला गेला आहे. जिल्ह्यातही सारस्वत समाज विखुरला आहे. तो संघटित करणे अवघड नाही पण त्यासाठी सर्व समाज बांधवांचा सक्रिय सहभाग असला पाहिजे. सारस्वत वाणी या अंकात डॉक्टर सुभाष पत्की, श्री मयुरेश मडूरकर, श्री शैलेश दाणी, ॲड. मयुरेश दळवी, सौ देवकी कामत, श्री चेतन कोटणीस, श्री शिरीष माणगावकर यांचे लेख कविता समाविष्ट आहेत. हा अंक परिपूर्ण व सर्व समावेशक नाही याची जाणीव ठेवून नवा प्रयत्न म्हणून याकडे पहावे. पुढील वर्षीच्या अंकात लिहिते व्हावे असे आव्हान करत, मी माझे संपादकीय पूर्ण करतो. तूर्त मोठे स्वप्न साकारण्यासाठी संघटित होणे, एकमेकांना मदत करणे, आनंद सुख दुःख प्रसंगात आधार देणे, आणि विवाह जुळवणे आदी गोष्टींसाठी पुढाकार घेणे गरजेचे वाटते. सर्व समाजाला सभासदांना आणि कोल्हापूर बेळगाव सातारा मुंबई कुडाळ व इतर ठिकाणच्या समाज संघटनांना शुभेच्छा देऊन थांबतो.

*हा अंक खाजगी वितरणासाठी असून अंकाचे सर्व हक्क सारस्वत समाज विकास मंडळ, सांगली यांचेकडे राहातील.*
*या अंकामधील लेख हे माहितीसाठी असून याबाबत संपादक तसेच मंडळ सहमत असेल असे नाही.*

## अध्यक्षांचे मनोगत



**डॉ. श्री विकास कोटणीस**
**अध्यक्ष**

सांगलीतील सारस्वत मंडळ गेली अनेक वर्ष कार्यक्रम उपक्रम घेत आला आहे. मात्र या सर्वांची माहिती संकलित करण्याचा विचार करुन यावर्षी या सर्व कार्यक्रम उपक्रमांचे संकलन करुन तसेच आपल्या समाज बाधवांचे लेखन साहित्य एकत्र करुन अंक प्रकाशित करावा असे सर्वांचे मत होते. यानुसार सन २०२३-२४चा **सारस्वत वाणी** हा अहवालसहित अंक आपल्या हाती देत असता मला खूप आनंद होत आहे.

आपला समाज हा चैतन्यशील असून आपल्या सर्व सदस्यांमध्ये एकता, संस्कृती परावर्तीत होत आहे. हा अंक आपल्या एकूण मगील वर्षीचा कार्यकाल दर्शवतो. आपली सर्वांची प्रेरक शक्ती, पाठिंबा व सक्रिय सहभागामुळे हा पहिला अंक प्रकाशित करणे शक्य झाले आहे.

या अंकामध्ये सारस्वत मंडळाने हाती घेतलेल्या उपक्रमांची माहिती आहे. सांस्कृतिक सण साजरे करणाया आनंदी मेळाव्यापासून ते वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाच्या उद्देशाने भविष्यातील उपक्रमाची माहिती आहे. आपण घेतलेल्या कार्यक्रमांनी केवळ सर्व एकत्र आलो नाही तर आपल्यामध्ये बंधही दृढ झाले आहेत. तसेच आपल्या समाजाच्या काही सभासदांच्या प्रियजनांना देवाज्ञा झाली. याची नोंद घेऊन त्यांना ही समाजामार्फत श्रद्धांजली अर्पिली आहे.

पारदर्शकता आणि उत्तरदायित्व हा आपल्या मंडळाचा आधारस्तंभ आहे आणि या अंकामध्ये आपण मंडळाचा अहवाल ही दिला आहे, जो आपल्या सर्व प्रयत्नांची स्पष्टता दर्शवतो. आपल्या मंडळाचा अर्थिक व्यवहार ही पारदर्शक असावा ह्या उद्देशाने आपण ऑडिट करुन सारंश या अंकामध्ये समाविष्ट केले आहे. तो मा. धर्मदाय आयुक्त यांना सुपुर्द करत आहे. समाजाचे संघटन करुन आपली कार्यशक्ती वाढवणे हे उदिष्ट ठेवून कार्य पुढे नेत आहे. तरुणांनी यामध्ये सहभाग वाढवून या शक्तीला बळ द्यावे हि अपेक्षा आहे.

आपला विनीत
डॉ. श्री विकास कोटणीस



# सारस्वत विकास मंडळ, कार्यकारिणी



**अध्यक्ष**

**डॉ. श्री विकास कोटणीस.**

डॉ. विकास श्रीकांत कोटणीस मूळचे सातारा येथील व आता सांगली येथे वास्तव्य. सन १९७४ मध्ये शालेय शिक्षण पूर्ण करुन प्लास्टिक इंजिनीयरिंग कोर्स प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. नामवंत ३/४ कंपनीमध्ये नोकरी करुन मार्च १९९०ला सांगली येथे पीव्हीसी पाईप उत्पादन कंपनीत जनरल मॅनेजर म्हणून रुजू व सलग २३ वर्षे काम करुन सन २०१५ला स्वेच्छानिवृत्ती घेतली. त्यानंतर १ वर्षाचा निसर्गोपचार कोर्स पूर्ण करून डॉक्टर झाले. ३६ वर्षाचा प्रदीर्घ प्लास्टिक इंजिनिअरिंग मधील अनुभवामुळे सध्या प्लास्टिक सल्लागार म्हणून देशात व परदेशात ४० कंपनींबरोबर सल्लागार म्हूणून कार्यरत आहेत. इंडियन रेड क्रॉस सोसायटी सांगली शाखेचे सदस्यत्व आहेत. रक्तदान शिबिरात सक्रिय सहभाग. स्वतः ५७ वेळा रक्तदान केले आहे. कुपवाड एमआयडीसीमधील उद्योजकांची कृष्णा व्हॅली चेंबर ऑफ कॉमर्स मध्येही सहभाग राहिला होता. ९ वर्षे सारस्वत समाज विकास मंडळ सांगलीचे अध्यक्षपद भूषवित असून विविध सारस्वत समाज संस्थांशी व व्यक्तींशी वैयक्तिक संपर्क आहे.

श्री. मंगेश माधव मंत्री, सांगली येथे वास्तव्य. मुळ गाव इस्लामपूर असून तेथेच त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण झाले. अर्थशास्त्र पदवीधर तसेच वृत्तपत्र विद्या प्रमाणपत्र पदवीधर. सध्या पत्रकार-संपादक म्हणून कार्यरत. साधारण ३० वर्ष तरुण भारत येथे नोकरी. सध्या दैनिक तरून भारत सांगलीचे तसेच तरुण भारत संवाद सोलापूर, कोल्हापूर सातारा आवृतीचे संपादक म्हणून जबाबदारी पार पाडत आहे. त्यांचा 'कुंकु' हा कथासंग्रह, 'त्यांचे जिणे' हा संपादकीय मृत्युलेख संग्रह नुकताच प्रकाशित झाला आहे. तसेच आकाशवाणी व दूरदर्शनसाठी लेखन व थेट प्रक्षेपणात अनेकवेळा सहभाग, त्याचप्रमाणे प्रभातीचे रंग ह्या कार्यक्रमासाठी दीर्घकाळ लेखन. विविध दैनिक मासिकातून कथालेखन व त्यासाठी पुरस्कारही मिळाले आहेत. श्री मंत्री यांना दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेचा पुरस्कार, केसरी मराठा ट्रस्टचा मालाकार भोपटकर शोध वार्ता पुरस्कार, सांगली जिल्हा पत्रकार संघाचा गणपतराव दप्तरदार आदर्श पत्रकार पुरस्कार ही प्राप्त झाला आहे. ग्रामीण जीवन सुधारणा आर्थिक विकास, शेती यांचा अभ्यास देखील त्यांनी केला आहे.



**उपाध्यक्ष**

**श्री मंगेश मंत्री**



**सचिव**

**श्री उज्वल तिळवे**

श्री उज्वल विष्णुपंत तिळवे. वास्तव्य सांगली येथे आहे. औषध दुकानदार म्हणून प्रसिध्द आहेत. दुकान व्यवसाय २०१३ साली बंद करुन पूर्णवेळ डॉ. शिरगांवकर ब्लड बँक याचे काम पाहतात. मागील ३४ वर्षे रेडक्रॉस, सांगली शाख़ा, या संस्थेत सेक्रेटरी या पदावर काम करत आहे. स्वतः अनेकवेळी रक्तदान केलेले असून रक्तदान चळवळीमध्ये पुढाकार घेऊन अनेक रक्तदान शिबिरे घेण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.

# सारस्वत विकास मंडळ, कार्यकारिणी



**खजिनदार**
**सौ. अरुणा साखवळकर**

सौ. अरूणा रमेश साखवळकर सांगली येथे अनेक वर्ष वास्तव्यास आहेत. त्या सारस्वत समाज सांगलीचे माजी अध्यक्ष. श्री. ना.व्यं. घोलबा यांच्या कन्या आहेत. त्या वाणिज्य शाखेच्या पदविधर आहेत. जी .ए. आरवाडे वाणिज्य महाविद्यालयाच्या नावजलेल्या ॲथलेट व भालाफेकची खेळाडू होत्या. तसेच १९७७ साली कबड्डीच्या राष्ट्रीय टिम मध्ये सहभागी होत्या. १९९८ ते २०२०पर्यंत इंडियन रेडक्रॉसच्या डॉ. शिरगांवकर रक्तपेढीच्या जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होत्या. विश्रामबागच्या स्त्री सखी महिला मंडळाचे अध्यक्षपद देखिल भुषविले आहे. सांगली येथील अनेक संस्थामधून सामाजिक कार्यात सहभागी होत असतात



**श्री. विनायक राजाध्यक्ष**
**सदस्य**

विनायक प्रल्हाद राजाध्यक्ष, मुळचे लांजा, रत्नागिरी येथील असून सध्या सांगली येथे वास्तव्य. त्यांनी एम.एससी- इन्फोर्मेशन टेक्नॉलॉजी करुन व्यवसायिक एथिकल हॅकिंग, सायबर फॉरेंसिक चे व्यवसायिक शिक्षण घेतले आहे. संगणक क्षेत्रामध्ये २७ वर्षाचा अनुभव असून सध्या सायबर फॉरेंसिक तज्ञ व सायबर सिक्युरिटी अभ्यासक म्हणून कार्यरत. **'CYBERJURIX – Institute of Cyber Forensics, Law and Research'** ह्या कन्सल्टंसी फर्मचे संस्थापक, संचालक आहेत. ह्या फर्मद्वारे संगणक किंवा मोबाईलद्वारे घडलेले सायबर गुन्हे उकल करण्यासाठीचे लागणारे सहकार्य दिले जाते. सांगली पोलीस विभाग तसेच इतर पोलिस विभागांसाठी ते सहकार्य करतात. विविध परिसंवादामध्ये सायबर विषयाचे वक्ते म्हणुन सहभाग, तर राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये शोध निबंध सादर केले आहेत.

विविध संस्था व कंपनी यांच्या वेबसाईट – **digital advertisement** चे काम करतात.



**श्री. जयंत नाईक**
**सदस्य**

श्री. जयंत उर्फ सुनील विश्वनाथ नाईक. सांगली येथे वास्तव्य. बी.ए एल.एल.बी (स्पेशल) पर्यंत शिक्षण झाले असून या नंतर सांगली-मिरज-कुपवाड शहर महानगरपालिका मध्ये कार्यरत. मार्च २०१६साली उपायुक्त पदावरून सेवानिवृत्त झाले. त्यांना चांगल्या प्रशासकीय कामासाठी नोव्हेंबर २०१३ साली राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले. नाट्य क्षेत्रात, अभिनय आणि दिग्दर्शन यासाठी पारितोषिके ही मिळाली आहेत. सध्या वकिली व्यवसाय करीत आहे.



**श्री. दिनेश दळवी**
**सदस्य**

वाणिज्य पदविधर तसेच , एल एल बी. ( स्पेशल) शिक्षण पूर्ण करुन बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये ३६ वर्ष सेवा वरिष्ठ प्रबंधक ( सिनियर मॅनेजर) या पदावर काम केले. राजापूर, भू (ता राजापूर जि.रत्नागिरी ), आटपाडी , वायफळे (जि. सांगली ), मारुल हवेली, मल्हारपेठ, पांचगणी ( जि.सातारा ), उल्हासनगर कँप ( जि.ठाणे) येथे मुख्य शाखा व्यवस्थापक म्हणून काम केले आहे. तसेच कोल्हापूर झोन मध्ये निरीक्षक तथा सतर्कता अधिकारी म्हणून कामकाज केले आहे. ३० जून २०२० रोजी बँक सेवेतून निवृत्त. निवृत्ती नंतर बँकेने एक वर्ष कालावधी करिता **Concurrent Auditor** म्हणून नियुक्ती केली.

# सारस्वत विकास मंडळ, कार्यकारणी



**श्री मयुरेश मडूरकर**
**सदस्य**

मुक्काम पोष्ट बागणी तालुका वाळवा जिल्हा सांगली येथे वास्तव्य. **B.Sc.(Statistics), M.B.A.-Marketing & Finance** असे शिक्षण पूर्ण करुन सारस्वत बॅंकमध्ये १३ वर्ष नोकरी केली. यानंतर नोकरीचा राजिनामा देऊन गोपालन, सेंद्रिय खत निर्मिती, मार्गदर्शन आणि विक्री असा शेती व्यवसाय सुरु केला. कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च सेंटर, सातारा कॉलेजकडून शेती उद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आला. हि.हा श्रीमंत विजयसिंहराजे पटवर्धन एकमेव मॅनेजिंग ट्रस्टी श्री गणपती पंचायतन संस्थान तर्फे सांगली जिल्हा समस्त ब्राम्हण समाज वतीने शेती क्षेत्रामध्ये उल्लेखनिय काम केल्या बद्दल सन्मान व सत्कार सांगली ब्राम्हण समाजातर्फे त्यांना गौरवण्यात आले आहे.



**श्रीमती वीणा दळवी**
**सदस्य**

वाणिज्य पधवीधर, गेली ८ वर्षे सारस्वत समाज विकास मंडळ सांगली मध्ये कार्यरत असून विविध सामाजिक संस्था आणि व्यक्तींशी संपर्क आहे. सारस्वत समाज विकास मंडळ सांगली तर्फे होणाया विविध कार्यक्रम, उपक्रम आणि सारस्वत समाजाच्या विकास कार्यात अग्रभागी असतात. सामाजिक भान राखून समाज बांधवाना मदत करणे हे उद्दिष्टय आहे.



**सौ. वृषाली कोटणीस**
**सदस्य**

सौ वृषाली विकास कोटणीस. पदवीधर, गृहिणी तसेच गृह उद्योजिका. ओरिफ्लेम तसेच मॅजिक स्टोव मध्ये मार्केटिंग केले. स्त्रियांचे दागिने व कपडे यांची विक्री करत होते.आता वधू वर सूचक मंडळ समाज सेवा म्हणून चालवते आहे. समाजाची सभासद १९९७ पासून असून आज पर्यंत प्रत्येक कार्यक्रमात सक्रिय सहभाग आहे.



**श्री विनय भट**
**सदस्य**

श्री विनय भट मुळचे बेळगांवचे असून सध्या सांगली येथे वास्तव्यास आहेत. त्यांचे स्थापत्य अभियांत्रिकी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. श्री सिध्दकला ग्रुप ह्या नावाने बांधकाम व्यवसायिक म्हणुन २९ वर्ष काम करत असून सांगली शहर व परिसरामध्ये विविध अपार्टमेंटचे प्रोजेक्ट पूर्ण केले आहेत. सारस्वत समाज तसेच इतर ब्राम्हण समाज संघटनामध्ये सक्रीय आहेत.

# ANNUAL REPORT FOR THE YEAR ENDED ON 31 MARCH 2024

**BANK**

Saraswat Co-operative Bank Ltd.
Ground Floor, 1068/4, Padmavati Complex,
Shastri Chowk, Maruti Road,
Near S.T. Stand,
Sangli 416 416. Maharashtra India

**AUDITOR**

MKK consultancy,
1st floor,  Mahalaxmi complex,
Behind, DCC Bank,
Pushparaj Chowk,
Sangli



सांगलीचे आराध्य दैवत श्री गणपती संस्थान

# वार्षिक अहवाल
## सन २०२३-२४

वर्ष २०२३ ते २०२४ या आर्थिक वर्षातील कार्यकारणीमध्ये काही नवीन सदस्य समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार या वर्षांमध्ये कार्यकारणीच्या ८ सभा घेण्यात आल्या व दोन कार्यक्रम संपन्न झाले. सांगली जिल्हा व जवळपासच्या परिसरातील सारस्वत ज्ञाती बांधवांना संघटित करण्यासाठी, तसेच सदस्यत्व नोंदणी, विविध सांस्कृतिक कार्यक्रम करण्याचे तसेच ज्ञाती बांधवांनी विशेष यश प्राप्त केले त्यांचे गौरव करणे व त्यांना प्रोत्साहन देणे याविषयी निर्णय घेण्यात आले

या वर्षातील कोजागिरी पौर्णिमेनिमित्त तसेच मकर-संक्रांती हळदीकुंकू व तिळगुळ वाटप समारंभ असे कार्यक्रम घेतले. कोजागिरी पोर्णिमेनिमित्त झालेल्या कार्यक्रमामध्ये छोट्या मोठ्या कलाकारांनी विविध कला सादर केल्या. या कार्यक्रमाला सदस्य बांधवांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला व असेच कार्यक्रम व्हावेत अशी इच्छा व्यक्त केली. या कार्यक्रमासाठी येणाया खर्चासाठी अल्प अवधीत वर्गणी देणगीद्वारे उत्तम प्रतिसाद दिला त्याबद्दल कार्यकारणी सर्व सदस्यांची आभारी आहे. या कार्यक्रमासाठी देणगी वर्गणीद्वारे ४९८५२/- रुपये निधी जमा झाला व दोन्ही कार्यक्रमासाठी रुपये १९३०० /- खर्च झाला.

सन २०२४-२५ या वर्षापासून सदस्यत्व नोंदणी करण्यासाठी केलेल्या आवाहनालाही उत्तम प्रतिसाद मिळत असून सभासद नोंदणी रुपये ५०० प्रति वर्ष वर्गणीद्वारे रक्कम जमा होत आहे. सारस्वत समाज विकास मंडळासाठी विविध स्वरुपामध्ये देणगी घेता येईल का, या बाबत देखील कार्यकारणी विचार करत आहे. सा.स.वि.मंडळाच्या खात्यामध्ये शिल्लक रक्कम सारस्वत बँक, सांगली शाखा, सांगली येथे फिक्स डिपॉझिट मध्ये गुंतवणूक केली आहे.

सा.स.वि.मंडळाची स्वतःची वास्तू असावी असा प्रस्ताव कार्यकारणीमध्ये सादर केला असून या बाबत योग्य ती कारवाई चालू आहे. क्ष्यासाठी सारस्वत समाज बांधवांनी सढळ हस्ते देणगी द्यावी असे आवाहन सा.स.वि.मंडळाद्वारे करत आहोत.



# सांस्कृतिक कार्यक्रम

## कोजागिरी मेळावा

२९ ऑक्टोबर २०२३

रविवार दिनांक २९ ऑक्टोबर रोजी सांगली येथील दांडेकर हॉल येथे समाजाचा कोजागिरी मेळावा संपन्न झाला. कु श्रावणी शेनॉई हिने गायलेल्या गणपती स्तोत्राने कार्यक्रम सुरू झाला. त्यानंतर श्री. विकास कोटणीस, श्री. उज्ज्वल तिळवे, श्री. मंगेश मंत्री, श्री. शाम वैद्य, श्री पत्की, श्री दळवी  यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन झाले. स्वागत व प्रास्ताविक श्री विनायक राजाध्यक्ष यांनी केले. प्रास्ताविकेमध्ये पुढील कार्यक्रमाचे आयोजन, तीन वार्षिक मेळावे, सभासद नोंदणी व त्याची प्रक्रिया, वधू वर सूचक माहिती, कार्यकारणीमध्ये झालेला बदल, तसेच दुःखद घटनामधील कुटुंबाला सांत्वन व धीर देणेसाठी सर्वांनी हातभार लावावा असे आवाहन करण्यात आहे.

या नंतर सांस्कृतिक कार्यक्रम झाला. कु. शेंनोय, श्लोका प्रभू, सौ दीपा वर्दे, प्रसाद तोरगलकर, शैलेश दाणी, ओम तिळवे, सानिका बडणीकर, मधुरा दाणी यांनी नृत्य व गायन कला सादर केल्या. श्री दीपक पत्की यांचे राशी व स्वभाव विषयावर मनोरंजनात्मक सादरीकरण केले. सर्व कलाकारांचा तसेच उत्स्फूर्त देणगी देणा-या देणगीदारांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

### दीप प्रज्वलन





### कला सादरीकरण व देणगीदारांचे सत्कार














## तिळगुळ व हळदी कुंकू कार्यक्रम

२१ जानेवारी २०२४

मकर संक्रांती सणानिमित्त तिळगुळ वाटप व हळदी कुंकू कार्यक्रम रविवार २१ जानेवारी २०२४ रोजी बापट बाल शाळा हॉल, सांगली येथे संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी ८५ सभासदांनी उत्साहाने सहभाग नोंदवीला. कार्यक्रम निःशुल्क होता. सभासदांनी स्वागत टेबलवर हजेरी सही नोंद केली. मान्यवरांनी दीप प्रज्वलन केले. श्री. विनायक राजाध्यक्ष यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. या मेळाव्याचा उद्देश तसेच पुढील स्नेहसंमेल्लन कार्यक्रमाबाबतचे नियोजन याची माहिती दिली. तसेच ह्या कार्यक्रमाचे कोणतेही औपचारिक स्वरुप नाही तर शुभेच्छा देणे आहे हे सांगितले. या नंतर प्रत्येक सभासदांनी स्वतःची व कुटुंबाची सर्वांना ओळख करून दिली. सर्वांनी एकमेकांना शुभेच्छा देत तिळगुळ दिला. स्त्री वर्गाने वाण वस्तूसह हळदी कुंकू ही केले. अल्पोपहार व चहा झाले नंतर कार्यक्रमाची सांगता झाली. सर्वांनी या कार्यक्रमाला भरभरून दाद दिली आणि आनंद घेतला.

हा कार्यक्रम यशस्वी करणेसाठी सौ. प्राप्ती व चेतन कोटणीस, मयुरेश दळवी, हर्षल पत्की, विनायक राजाध्यक्ष, कु. नुपूर राजाध्यक्ष आणि सौ. मैत्रेयी तीळवे यांचे सहकार्य लाभले.









दीप प्रज्वलन

उपस्थिती

# सदिच्छा भेट

## श्री सिध्दार्थ सिनकर, सारस्वत चेंबर्स, मुंबई यांची भेट

सारस्वत चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई ही सारस्वत लोकांनी सारस्वत लोकांसाठी स्थापन केलेली संस्था असून व्यवसाय व व्यवसायातील उपलब्ध संधी सारस्वत लोकांपर्यंत पोहचवण्याचे काम करते. जागतिक स्तरावर सारस्वत व्यावसायिकांमध्ये संपर्क प्रस्तापित करणे, उद्यमशिलता, क्षमता आणि उद्योजकता विकास होणेसाठी मदत करणे, तसेच सल्लागार समितीमार्फत सल्लागार सेवा देऊन मदत करणेसाठी काम करत असते. व्यवसायासाठी महत्त्वाच्या क्षेत्राशी संबंधित विविध कार्यशाळा, शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करत असते.

या संस्थेचे संचालक श्री. सिध्दार्थ सिनकर प्रवासादरम्यान सांगली येथे आले असता त्यांची श्री. विकास कोटणिस, श्री उज्जव तिळवे, श्री. विनायक राजाध्यक्ष, श्री. सुनिल देशपांडे व श्री. विनय भट यांनी भेट घेतली. श्री सिध्दार्थ सिनकर यांनी सारस्वत चेंबरचे काम कसे चालते या बाबत माहिती दिली. त्यांच्या बरोबर झालेल्या चर्चेमध्ये आपल्या समाजातील तरूणांमध्ये उद्योजगता वाढवण्याबाबत कार्यक्रम कसे घेता येतील, तसेच जे सध्या उद्योजक आहेत त्यांना कशाप्रकारे मदत करता येईल या बाबत सविस्तर चर्चा झाली. त्याचप्रमाणे सांगली, कोल्हापूर सातारा येथे असलेल्या उद्योजकांसाठी संयुक्त कार्यक्रम घ्यावा असे ही सुचविले. ह्या सर्व कार्यक्रमासाठी सारस्वत चेंबर सहकार्य करेल याची त्यांनी ग्वाही दिली.



## गौड सारस्वत ब्राह्मण समाज, वेंगुर्ला - स्नेह व वधुवर मेळावा भेट

रविवार दि २८ जानेवारी २०२४ रोजी गौड सारस्वत ब्राह्मण समाज, वेंगुर्ला यांचा स्नेह व वधुवर मेळावा संपन्न झाला. वेंगुर्ले, मालवण कुडाळ येथील सभासद मेळाव्यात हजर होते. सारस्वत मंडळींचे एकत्रिकरण होऊन विचारांची देवण घेवाण व्हावी हा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमासाठी आपल्या मंडळाचे अध्यक्ष श्री. विकास कोटणीस, व सदस्य श्री. विनायक राजाध्यक्ष, कोल्हापूरचे श्री प्रभावळकर यांना प्रमुख पाहूणे म्हणून निमंत्रण दिले होते. ह्या स्नेह मेळाव्यामध्ये श्री. विकास कोटणिस यांनी आपल्या समाजाचे एकत्रीकरण, विविध जिल्ह्यामध्ये काम करत असलेले आपण सर्वांनी मिळून समन्वय साधून समाजासाठी काम करावे असे विचार मांडले. श्री. विनायक राजाध्यक्ष यांनी एकमेक मंडळांची ओळख, कार्यपद्धती आणि विचार देवाण घेवाण अंतर्गत समाजाचा इतिहास, समस्या यावर भाष्य केले.

सारस्वत बँकेचे संचालक श्री. सौदागर सर यांची ओळख झाली व त्यांच्याबरोबर समाजाच्या कार्याबाबत विषयांवर सकारात्मक चर्चा झाली. श्री सौदागर तसेच श्री अनंत खंडागळेकर (वधूवर मंडळ) यांनी सिंधूदुर्ग जिल्हा व वेंगुर्ले मंडळाच्या पदाधिका-यांनी सांगलीच्या मंडळाला भेट देण्याची इच्छा व्यक्त केली.





**सौ अरुणा सखावलकर**

मल्हार सहनिवास,
बापटमळा जवळ, सांगली

98223 76999

# सिंहावलोकन - सारस्वत समाज विकास मंडळ सांगली

साधारण पन्नास पंचावन्न वर्षांपूर्वी म्हणजे अंदाजे १९६७-६८ ला रामकृष्ण जप्तीवाले, मधुकर पागे, सध्याचे सदस्य सुनील नाईक यांचे वडील श्री विश्वनाथ नाईक, विजय बक्षी यांनी गौड सारस्वत ज्ञाती बांधवानी एकत्र येऊन गणरायाच्या सांगली शहरापूर्ते सारस्वत समाजाचे छोटेसे रोप लावले. आजमितीस त्याचा वृक्ष बहरू लागला आहे. हे रोप लावताना आपल्याच ज्ञातीमधील थोर विचारवंत, लेखिका कै. सुमती क्षेत्रमाडे यांच्या विचार प्रणालीच्या सहभागाने मंडळाची सुरुवात केली. पण हा प्रयत्न पुर्णत्वास न जाता तो थोडा विस्कळीत झाला. हाताची पाच बोटे ही सगळी एकसारखी नसतात. पण एकत्र आली की मूठ तयार होते आणि ती कोणत्याही संघर्षाशी प्रतिकार करायला तयार असते. याच तत्वाने 'संघ शक्ती कलीयुगे' या संस्कृत वचनाचा आधार घेत परत १९९७ मध्ये श्री. वागळे, श्री. लाड, श्री ना. व्यं. घोलबा, अंजली सामंत ,डॉ.प्रभू, श्री बेडेकर, श्री सलगर यांनी परत एकदा समाजाची मोट बांधायची या विचाराने सभासद एकत्र करून सारस्वत समाज विकास मंडळाची रीतसर नोंदणी केली. सामाजिक, शारीरिक, बौद्धिक, मानसिक व आध्यात्मिक विचारांच्या मोठ्या संकल्पना मनात ठेवून स्थापना केली आणि थोड्या शिथिल झालेल्या समाज बांधवांना पुन्हा एकत्र, एकसंध करण्याचे काम सुरु केले. या संकल्पनांची परिपूर्तता करण्यासाठी, अंतर्गत कलांना वाव मिळाण्यासाठी सभा, शिबिरे, विविध विषयांवर चर्चा, सांस्कृतिक कार्यक्रम, गुणदर्शन कार्यक्रम आयोजित करणे सुरू केले. आपल्या ज्ञातीतील विशेष गुण संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच जेष्ठ नागरिकांचा सत्कार ही सुरू करून सर्वच वयोगटातील लोकांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न सुरू केला. वैदिक संस्काराची अभिरुची उत्पन्न व वृद्धिंगत करण्यासाठी सार्वजनिक श्रावणी तसेच धार्मिक विद्वानांची प्रवचने, आरोग्य संपन्न व्हावे या करिता, तसेच घरगुती व आयुर्वेदाची माहिती मिळावी याकरिता आयुर्वेदाचार्यांची व्याख्याने आयोजीत केली. धार्मिक व राष्ट्रीय उत्सव साजरे करणे या अंतर्गत १५ ऑगस्ट, २६ जानेवारी, तिळगुळ समारंभ, कोजागिरी पौर्णिमा हे सण सामूदायिक साजरे करायला सुरुवात केली. वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये ज्ञाती बांधवातील लोकांचे विविध गुणदर्शन करण्याकरता प्रोत्साहन दिले जाऊ लागले. १५ ऑगस्ट, २६ जानेवारी हे राष्ट्रीय सण साजरे करताना रक्तदानासारखे पवित्र सामाजिक कार्य करून ज्ञाती बांधव सामाजिक बांधिलकीपण सांभाळत आहेत. अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजवंदन, रक्तदान, सत्यनारायण तसेच महिलांनी स्कूटर रॅली सारखे कार्यक्रम प्रचंड उत्साहात साजरे केले. यासाठी नव पिढीने प्रचंड उत्साहात प्रचंड प्रतिसाद देत आपली सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले.

सध्याचे प्रमुख काम म्हणजे देशभर विखुरलेल्या आपल्या ज्ञातीमधील अनुरूप वधूवरांची माहिती मिळवणे. याकरिता दरवर्षी वधू वर मेळावे करण्याचे स्तुत्य उपक्रम पण सुरू केले. यासाठी विखुरलेल्या ज्ञानी बांधवांनी योग्य ती माहिती द्यावी ही विनंती ही सांगली सारस्वत विकास मंडळ करीत होती व सध्या करत आहे. २०१६साली गोव्याला झालेल्या सारस्वत स्नेहसंमेलनात सांगली सारस्वत विकास मंडळाने चांगला सहभाग घेतला व त्यात आपल्या ज्ञाती बांधवांच्या अडचणी मांडल्या.

बदलत्या काळानुसार नवीन संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी मंडळ प्रयत्नशील आहे. ज्ञातीमधील सह घटक जसे कुडाळदेशकर, बरदेशकर, भालावलिकर यांना एकत्र सामावून घेणेचे प्रयत्न सुरू आहेत. सारस्वत समाजाच्या संस्था व जिल्हा स्तरीय मंडळे यांचेशी उत्तम समन्वय साधत विचारांची देवाण घेवाण सुरू असते. आज ही समाज एकत्र यावा व सर्वांनी एक दिलाने एकमेकांना सहकार्याची भावना जपावी म्हणून विविध कार्यक्रम हाती घेत आहोत.



डॉ . सुभाष गजानन पत्की

२६१७, टिळक चौक,
इस्लामपूर, जि: सांगली

9272324096

# बदलती जीवनशैली: काळाची गरज

तसं बघितलं तर आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये सण,उत्सव आणि समारंभ यांना विशेष स्थान देण्यात आलंय.खरंतर ते स्वाभाविकच आहे.रोजच्या दैनंदिन व्यस्त जीवनशैलीतून तेवढाच विरंगुळा व मित्रपरिवार नातलग यांच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष भेटींमधून एकमेकांची आस्थेने विचारपूस, सुसंवाद,ज्ञान व विचारांची देवाण-घेवाण, शुभेच्छांचे आदान-प्रदान, थोरामोठ्यांचे आशीर्वाद मिळणे यांमुळे आत्मविश्वास, मनोबल व सात्विक भाव वाढण्यास निश्चितच मदत होते.

सणांची आतुरतेने वाट पाहताना भेटकार्ड, नववस्त्र, गोडधोड पक्वान्न हेही मग ओघानं आलंच. तीळगूळ देणं -घेणं व गोड बोलणं हे फक्त एका दिवसासापुरते सीमित नसून नात्यांचा गुणदोषांसह स्वीकार व जपणूक करायला हवी, हेच तर सण सर्वांना संदेश देत असतात, औचित्य असते ते फक्त त्या दिवसाचे!

आजच्या धकाधकीच्या व्यस्त व्यवहारी जीवनात मानवी नीतीमुल्यांची  जणू घसरण होते की काय ? व संस्कृतीची जपणूक व संवर्धन करण्यात भावी पिढी कुठेतरी कमी पडते की काय? अशी नकळत भीती व धास्ती आजकाल सर्वांनाच वाटू लागलीय. कारण आजच्या आधुनिक युगात संगणक इंटरनेट सोशल मीडियाच्या भाऊगर्दीत 'जग जवळ आलं हे खरंय परंतु माणूस मात्र माणसापासून पुरता दुरावला गेलाय  हे मात्र नक्की'. नात्यांमधला गोडवा, स्नेह, आत्मीयता, काळजी, जिव्हाळा सर्व काही संपुष्टात येऊ लागलेय की काय ? अशीच एकंदर स्थिती निर्माण झालीय.

गरजेनुसार व्यक्ती एकत्र येतात,गोड बोलतात पण एक जागरूक, दक्ष, डोळस व्यक्ती या नात्याने मुखवट्यामागच्या चेह-यांना, त्याचप्रमाणं पुस्तकांपेक्षा माणसांचे चेहरे व अंतरंग प्रत्येकाला वाचता यायला हवेत. नवीन पिढीला पुस्तकी ज्ञानापेक्षा व्यवहारज्ञानाचे, संस्कारांचे,थोरामोठ्यांचे आदर्श, संतवाणी यांच्या शिकवणुकीचे बाळकडू पाजायला हवे. निश्चितपणे त्याचा परिणाम म्हणून वृद्धाश्रमातील ज्येष्ठांची संख्या आपोआपच घटेल किंबहुना वृद्धाश्रमांची निर्मिती करण्याची तसदीदेखील प्रशासनाला घ्यावी लागणार नाही.

पैशाशिवाय काही होत अथवा चालत नाही हे अगदी खरं असलं तरी कोरोनासारख्या महामारीने मात्र आपले आरोग्य,मानसिक स्वास्थ्य मनोबल, रोगप्रतिकारक शक्ती, सत्कर्माने सात्विक भाव हेच घटक मनुष्याला संकटातून यशस्वीपणे व सहीसलामत बाहेर पडण्यासाठी उपयुक्त ठरतात हे पुन्हा एकदा अधोरेखित केलेलं आहे.एक अहंकार बाजूला ठेवला, मानसन्मानाची देवाणघेवाणीची उधळण करीत राहिलं,मोठ्या मनाने छोट्या छोट्या गोष्टींमधूनही सुख, समाधान व आनंद शोधता आला तर नक्कीच जीवन संघर्षमय न वाटता जणू एक आनंदयात्राच वाटू लागेल. द्राक्षाच्या घडाला बाजारात नेहमीच जास्त भाव असतो व सुट्टी झालेली द्राक्षे कमी भावात जातात, त्यामुळे समाज, कुटुंब, परिवार, मित्र यांच्याशी एकरूप व समरस होऊन एकोप्याने नवसंकल्प, ध्येयधोरणे, उद्धारासाठीची उपाय योजना आखून व त्याच्या अंमलबजावणीसाठी एकीने प्रयत्न करणे यातून समाजाचे सामर्थ्य वाढेल यात संदेह नाही. केक, बुके ,स्टिकर्स यांचा व्हॅट्सऍप माध्यमातून भडीमार करून सोपस्कार पार पाडण्यापेक्षा प्रत्यक्ष अथवा फोनमधून केलेला थेट संवाद व  शुभेच्छा ह्या त्या व्यक्तीला लाखमोलाच्या ठरू शकतात.

एक काळ होता जेव्हा सर्वजण पोस्टमनची पत्र,टपाल, भेटकार्ड, मनीऑर्डर यासाठी वाट पहायचे.पण काळाच्या ओघात ती जागा मोबाईल, इंटरनेट व गुगल-पे, फोन-पे ने घेतली. एक जमाना होता, जेव्हा शिक्षकांविषयी अतूट विश्वास, आदर, मानसन्मान असायचा व वेळप्रसंगी त्यांनी केलेल्या शिक्षा व बद्दल

कोणी पालक जाब विचारण्यासाठी जात नसत,पण तेच आता विद्यार्थ्यांना शिक्षा, शासन हे शब्द फक्त कागदावरच उरलेत.संस्कार,परिपाठ, जडणघडण, खिलाडूवृत्ती, समभाव,ऐक्य, एकात्मता हे फक्त भाव नसून मानवी जीवनाचे अलंकार असल्याची प्रचिती त्यावेळी पदोपदी यायची.सणासुदीला नवीन कपडे, गोडधोड मिष्ठान्न, एकत्र भोजन याचं एक अप्रुप असायचं, पण त्यांची जागा आज सेल, ऑनलाइन शॉपिंग, हॉटेल्स,फुडमॉलने घेतलीय.वाटून खाल्ल्याने आनंद वाढतो असं असताना आजकाल बंद दरवाज्याच्या आत विभक्त कुटुंबपद्धतीत सेलिब्रेशनचं फॅड आलंय.विद्यार्थ्यांची व मनुष्याची पारख ही अनुक्रमे त्याचे गुण व मिळकत, पगार यांवरून होऊ लागलीय की जी खरंतर गुणवत्ता व कर्तृत्त्व यांनी व्हायला हवी. आवडत्या कामातून मिळणारा आनंद,आत्मिक समाधान हे मिळणाया वेतन किंवा मानधनापेक्षा लाखमोलाचे असू शकते.कला,छंद यांची जोपासना व स्वतःसाठी तसेच कुटुंबीयांसाठी वेळ, मनमोकळेपणाने बोलणे वागणे,सहल ह्या गोष्टीसाठी वेळ नसतो व फार व्याप आहे ’या नावाखाली नेहमीच सोयीस्कररित्या दुर्लक्षित केल्या जातात.मग सुरुवात होते ती मानसिक घुसमट व घालमेलीची.त्यातून प्रवचन, कीर्तन, प्रबोधन यांमध्ये उपस्थिती व नंतर दानशूरपणा जागृत होतो मनःशांती मिळविण्यासाठी! खरंतर श्रीमद्‌भगवद्‌गीता ही मनुष्याला यशस्वी, सुखी, शांत आणि तृप्त जीवन जगण्याचा मार्ग दाखविते. विद्या प्राप्त करायची असेल तर माणसांमध्ये विनम्रता, जिज्ञासा आणि सेवावृत्ती या तीन गोष्टी असायल्या हव्यात असा मौलिक संदेश गीता देते. त्यामुळे गीता आचरणात आणायला हवी, मग मनोबल सामर्थ्य, कर्तृत्व आपोआपच वाढीस लागेल.



मनात आणलेल्या हिताच्या गोष्टी, संकल्प सत्यात उतरून तडीस जायचे असतील तर त्यासाठी आवश्यक असलेले आपले ‘निरोगी व दीर्घायुष्य’ हे माध्यमही तितकेच महत्त्वाचे आहे. पूर्वजांनी दूरदृष्टीने शास्त्रोक्त पद्धतीने रचना केलेले विविध सण, उत्सव, समारंभ हे स्वास्थ्याचा विचार करून त्यांनी उपदेशिलेली जीवनशैली ही मुख्यतः आप्तवचन स्वरुपात भावी पिढ्यांना मोलाची व मार्गदर्शक नेहमीच ठरते.

निरोगी व दीर्घायुष्यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, व्यसनमुक्त जीवन व ताण-तणावमुक्त जीवनशैली ही जणू यशस्वी जीवनासाठीची चतुःसूत्रीच मानावी लागेल.

त्या त्या ऋतूत पिकणारा भाजीपाला ,फळे यांचा आहारात कटाक्षाने वापर, सर्व पोषक तत्त्वांनीयुक्त चौरस आहार,प्रसन्न मनाने, जेवणाच्या योग्य वेळा सांभाळून तसेच सायंकाळी कुटुंबियांसोबत स्नेहभोजन व हितगुज,फास्टफुड, बेकरी उत्पादनांना फाटा, चालण्यासारखा साधा, सोपा पण नियमित व्यायाम,वाईट सवयी व  व्यसने यांचा कटाक्षाने त्याग व मनोबल उंचावण्यासाठी योग, ध्यान, प्राणायाम, आसन यांचा शास्त्रोक्त पद्धतीने अवलंब नि जप-तप नामस्मरण यांमुळे निश्चितच सधन व सुबत्तेच्या काळात ,ऐहिक सुखोपभोगाच्या रेलचेलीत मनुष्याचे  हरवून  बसलेले ‘स्वास्थ्य’ पुन्हा प्रस्थापित होईल यांत तीळमात्र शंका नाही. फक्त गरज आहे ती सध्याच्या गतिशील स्पर्धेच्या जीवघेण्या जीवनशैलीत योग्य ते सकारात्मक बदल घडवून आणण्याची!



**मयुरेश मड्डूरकर,**
शेती अभ्यासक व तज्ञ
बागणी
सांगली
99231 31948

# निसर्गाच्या सोबतीने. . .

खरंच आज वाटते आहे की आयुष्याच्या मध्यावर भरभरून जगणे जमले.... याआधी समजत नव्हते असेही नाही.

पण आतापर्यंत आयुष्याची पळापळ सुरू होती. घराची जबाबदारी, कुठे फुरसत होती स्वतःला वेळ द्यायला. तरीही त्यातून मी मात्र जसे जमेल तसे स्वतःला खूप समजून घेत गेलो. ज्यात आवड होती ते ते करत गेलो. बँक नोकरी, वाचन, लेखन जसे जमेल ते ते केले. मित्र मैत्रिणींशी संपर्कात राहणे. साधी सोपी जगण्याची माझी परिभाषा, माझी मीच ठरवलेली. जास्त धन, पैसा लागतच नाही जगण्यासाठी, तर लागते मनाची उमेद, ती निर्माण झाली की जगणे भारी होते.

जीवन मानले तर सुंदर आहेच, पण आचारविचार, चांगली संगत, यामधून आपण समृद्ध होत जातो....

जगतात तर सर्वच, पण जरा हटके नेहमी आनंदात समाधानात जगण्याचा माझा प्रयास असतो आणि कुणाकडे फारसे लक्ष न देता, मी माझे मस्त जगून घेतो.

मस्त सकाळची वेळ, गावाकडचं आल्हाददायक वातावरण, पहाटे छान फ्रेश होऊन अर्धा तास पायी चालणे, गोसेवा, आमच्या शेतातील नियोजन. सध्या आम्ही स्वतः जीवामृत तयार करून शेतकयांना माहितीपूर्वक वापरण्यास सांगून जमीन वाचवून गुणवत्तापूर्ण पीक मिळेल यासंदर्भात प्रयत्न करत आहोत .माझ्या संपर्कात येणारी प्रत्येक व्यक्ती स्वावलंबी व्हावी हीच इच्छा.

रस्त्यावर येणाया जाणाया लोकांशी मनोमनी नमस्कार करणे हे फार सुखकर वाटते.

मनाला जास्तीत जास्त ताजेतवाने ठेवणे, हे आपल्याच हातात आहे.... मनाला चांगल्या विचारांची जोड मिळाली की मन खुप खुश होत.... ह्याचा अनुभव घेत आहे.... आयुष्य खूप लहान आहे पण खूप म्हणजे अतिशय सुंदर आहे...

जिंदगी और कुछ भी नही... तुम्हारी, मेरी, आप सब की बहुत सुंदर जीवन कहानी है....

मस्त जगत रहा ... पानं, फुलं, फळं मला जीव की प्राण आवडतात.... त्यांच्या संगतीने माझे जीवन सुंदर झाले.... त्यांच्या संगतीत राहून निसर्गासोबत रमून जातो.

निसर्गावर प्रेम करा... निसर्ग कसा अधिक बहरेल यासाठी प्रयत्न करा...

निसर्गाच्या जवळ जाऊन... निसर्गासोबत राहून... माणूस समाधानी होतो.

आमची, आपली सगळ्यांची धडपड ही समाधानी

राहण्यासाठीच चालू आहे.

आपण ज्या निसर्गासोबत राहून समाधानी राहतो त्याचे

ऋणी राहून सेवा केल्याचे समाधान निराळंच





**शैलेश दाणी**
शिक्षक
उगार, कर्नाटक

99002 29285

# सफर कोकणची

गेले अनेक दिवस आमच्या शाळेतील माध्यमिक विभागाच्या शिक्षकांची सहल जाणार, जाणार म्हणून गाजत होती. पण योग जुळून येत नव्हता. कागदावर योजना तयार व्हायची, पण ऐनवेळी काहीतरी अडचण येऊन जाण्याचा बेत रद्द व्हायचा. अखेर तो दिवस उजाडला. १२ जानेवारी २००८ रोजी पहाटे पाच वाजता आम्ही सर्व शिक्षक दोन क्रुझर गाड्या करून निघालो. मालवणला जायचे ठरले होते. चिक्कोडी मार्गे प्रथम निपाणीस गेलो.

पहाटेची प्रसन्न वेळ, गार वारा अंगाला झोंबत होता. सहा वाजता निपाणीत एके ठिकाणी चहा घेऊन आम्ही पुढे निघालो. आम्ही ठरवलेलं नसताना एक ठिकाण आम्हाला पाहायला मिळालं. ते म्हणजे आदमापूर, संत बाळूमामांची तेथे समाधी आहे. मंदिराचे आवार खूपच प्रशस्त आहे. गाभायातील बाळूमामांची मूर्ती अगदी सजीव भासते. मंदिराच्या आवारात भिंतीवर बाळूमामांची वेगवेगळ्या रूपातील चित्रे रेखाटलेली आहेत. ती आम्हाला खूपच आवडली. तेथे प्रसाद म्हणून नाचणीचे आंबील दिले जाते.

पुढे आम्ही राधानगरी धरणाला भेट दिली. शाहू महाराजांच्या काळात याचे बांधकाम झालेले आहे. धरणाच्या जलाशयाचे दृश्य अतिशय नयन मनोहर आहे. ज्यावेळी आम्ही तेथे गेलो त्यावेळी काही शाळांच्या सहलीही आलेल्या होत्या. सर्व मुले ओळीत शिस्तीत जात असलेली पाहून आम्हाला खूपच कौतुक वाटले.

साडेदहा वाजता आम्ही राधानगरीहून निघालो. पुढे घाटातून गाडी जाताना तेथील निसर्ग सौंदर्य पाहून आमचे भान हरपून गेले. कणकवली मार्गे दुपारी एक वाजता आम्ही मालवण येथे पोहोचलो. राहण्याच्या व्यवस्थेसाठी आधीच फोन करून कळवल्यामुळे फारसा त्रास झाला नाही. जेवण व थोडी विश्रांती घेऊन दुपारी अडीच वाजता आम्ही सिंधुदुर्ग हा किल्ला पाहण्यासाठी निघालो. हा किल्ला समुद्रामध्येच बांधलेला आहे. तेथे जाताना नावेतून जावे लागते. किल्ल्याजवळ जाईपर्यंत किल्ल्याचे प्रवेशद्वार कोठे आहे हे लक्षातच येत नाही. पाश्चिमात्य व्यापा-यांचा धोका छत्रपती शिवाजी महाराजांनी वेळीच ओळखून कान्होजी आंग्रे यांच्या नेतृत्वाखाली सुसज्ज आरमार बनवले व जलदुर्ग निर्माण केले.

किल्ल्यामध्ये शिवरायांचे मंदिर आहे. तेथे नावाड्याच्या वेशातील महाराजांची मूर्ती आहे. पुढे महादेवाचे मंदिर असून तेथून मालवण पर्यंत भुयारी मार्ग आहे. साखरबाव आणि दूधबाव अशा दोन विहिरी आहेत. आश्चर्याची गोष्ट ही की भोवतीने समुद्र असूनही विहिरीला गोडे पाणी आहे. तेथेच भवानी मातेचे जुने मंदिर आहे. किल्ल्याच्या तटबंदीवर शिवाजी राजांच्या डाव्या पायाचा व उजव्या हाताचा ठसा उमटवलेला आहे.



संध्याकाळी ४-३० ला आम्ही परत नावेतून किना-याकडे परतलो व. तारकर्ली बीच पाहण्यासाठी गेलो.

अथांग पसरलेल्या सागराचा धीर गंभीर आवाज दूरवर ऐकू येत होता. लाटांची गाज आसमंतात भरून राहिली होती. त्या विशाल रत्नाकरला पाहून मानवाचा क्षुद्रपणा आणि ा जीवनाची क्षणभंगुरता जाणवली. थोड्याच वेळा सहस्त्र रश्मी आपली ड्युटी संपवून अस्ताला चालला. आकाशाच्या कॅनव्हासवर कोणा चितायाने जणू आपला कुंचला फिरवला असावा. समुद्राच्या पाण्यावर ही लालसर रंगाची छटा पसरली. ते सुंदर दृश्य आम्ही कॅमेयामध्ये बद्ध केले.

दुस-या दिवशी मालवण मधील मुक्काम हलवून कुणकेश्वरच्या दिशेने निघालो. वाटेत गजाननाचे सुरेख मंदिर पाहण्यास मिळाले. मंदिराचे बांधकाम हेमाडपंथी प्रकारचे वाटले. गणेशाची अतिशय सुबक व देखणी मूर्ती येथे आहे. पहाटेच्या शांत वातावरणात विघ्नहर्त्याचे दर्शन झाल्यामुळे मन कसे प्रसन्न झाले.



सकाळी आठच्या सुमारास आम्ही कुणकेश्वरला पोहोचलो. समुद्रकाठी असलेलं हे महादेवाचे मंदिर खूपच सुंदर आहे. गाभायात शिवलिंग आहे. तेथे बसल्यानंतर तेथून उठूच नये असं वाटत होतं. तेथील शांत व प्रसन्न वातावरण मनाला खूपच भावले. समुद्रामध्ये काही खडकांच्यावर शिवलिंग कोरले आहेत.तेथून पुढे आम्ही विजयदुर्गाकडे कूच केले.

विजयदुर्गाला किल्ल्यात प्रवेश करताक्षणीच दर्शनी भागात एक मारुतीची मूर्ती आहे. तो किल्ला भोजराजाने बांधवला. ८०० वर्षापूर्वी बांधलेल्या या किल्ल्याचे प्रवेशद्वार लाकडी असून ते अजूनही शाबूत आहे. किल्ल्यात पंचधातूचे गोळे ठेवले आहेत. तेथेच खलबतखाना आहे. पूर्वी तेथे गुप्त खलबते चालायची. पुढे ध्वज स्तंभ आहे. घोड्याचा तबेला आणि त्याच्यासमोर तुळशी वृंदावनाचे भग्न अवशेष उरले आहेत.




तीन मजली राणीचा महाल पाहिला. तेथील लाकडी तुळ्या अजूनही चांगल्या अवस्थेत आहेत. पुढे भुयारी मार्ग व धान्याचे कोठार पाहिले. सूर्याभोवती हेलियमचा थर आहे. याचा शोध एका फ्रेंच शास्त्रज्ञाला येथेच लागला. कारण तेथून सूर्याचे अंतर खूप जवळ आहे. अशी गाईडने आम्हाला माहिती दिली. सौर ऊर्जेवर वीज निर्मिती केंद्रही तेथे आहे. भवानी मातेची मूर्ती जी इंग्रजांच्या आक्रमणाच्या वेळी फेकून दिली होती. त्याची पुनर्स्थापना येथे केलेली आहे. जरा पुढे गेल्यानंतर पोहण्याचा तलाव आहे. त्याच्या बांधकामासाठी चुना व गूळ यांचे मिश्रण वापरले आहे. त्याचा घाणाही अजून चांगल्या अवस्थेत आहे. विजयदुर्ग किल्ल्याच्या भोवताली खंदक आहे. समुद्रात एक भिंत बांधली आहे. ती सहजासहजी दिसत नाही. त्यामुळे इंग्रजांची जहाजे पुढे येऊ शकली नाहीत. हे सर्व पाहून शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे व अचाट बुद्धिमत्तेचे कौतुक वाटले. त्यांच्या कार्यापुढे नस्तमस्तक व्हावे.

विजयदुर्गहून पुढे पावसला पोहोचलो. पावसला स्वामी स्वरूपानंदांची समाधी आहे. मंदिराचे आवार अतिशय स्वच्छ आहे. मंदिराच्या आवारात सगळीकडे महाराजांची बोधवाक्य लिहिलेली आहेत. मंदिराचे आवार अतिशय प्रशस्त असून दर्शनी भागात ज्ञानेश्वरीच्या अनेक प्रति ठेवलेल्या आहेत. उद्देश हा की दर्शनाला येणाया प्रत्येकाने एक तरी ओवी वाचावी व अनुभवावी. ही गोष्ट खूपच आवडली.



पावसहून रत्नागिरी मार्गे आम्ही गणपतीपुळ्याला सायंकाळी ५ वाजता पोहोचलो. थोडी पेटपूजा करुन मग गणपतीच्या दर्शनाला गेलो. रविवार असल्यामुळे खूप गर्दी होती. रांगेत उभे राहून सर्वांनी दर्शन घेतले. हे मंदिरही खूपच सुंदर आहे. डोंगराच्या पायथ्याशी हे वसले आहे. प्रदक्षिणा मार्गही डोंगराच्या सभोवती आहे. बीचवर जाऊन सूर्यास्ताचे सोनेरी क्षण कॅमेयामध्ये वद्ध केले.



रात्री सात वाजता आम्ही गणपतीपुळे सोडले. आंबा घाट ओलांडल्यावर एका ढाव्यावर जेवण घेतले. रात्री साडेबारा वाजता उगारला परत आलो. दोन दिवस आम्ही शिक्षक आहोत याचाच विसर पडला. आमच्याबरोबर आमच्या संस्थेचे सचिव के. आण्णा देशपांडे हेही होते. त्यामुळे आमचा आनंद द्विगुणीत झाला. ' प्रौढत्वी निज शैशवास जपणे ' याचा पुरेपूर अनुभव आम्हाला आला. गाण्याच्या भेंड्या, विनोद, थट्टा मस्करी यामुळे सर्व शिक्षकांच्या मध्ये खेळीमेळीचे वातावरण तयार झाले. त्यामुळेच दुसरे दिवशी आम्ही नव्या उत्साहाने आमच्या नेहमीच्या कामावर रुजू झालो. अशी ही अविस्मरणीय सहल.



**शिरीष माणगावकर**
भाषा अनुवादक
सांगली

8691964121

# चविष्ट, स्वादिष्ट, चमचमीत सांगली

सांगली असे चांगली बहुत, चविष्ट स्वादिष्ट अन् चमचमीत




प्रत्येक गावातील खाद्यपदार्थांची एक विशिष्ट चव असते. जसे कोल्हापूर म्हणले की तिखटजाळ चव ! सांगलीत मात्र चविष्ट, स्वादिष्ट, चमचमीत खाद्यपदार्थांची रेलचेल आहे. नाष्ट्यासाठी पोहे, उप्पीट, शिरा, इडली, उडीद वडा, डोसा, ढोकळा, कचोरी असे पदार्थ, शाकाहारी भोजनाच्या खानावळी, मांसाहारी जेवणाची अनेक ठिकाणे, बिर्याणी, बॉईल अंडा फ्राय, अंडा वडा, भेळ, पाणीपुरी, पावभाजी, लस्सी, आईस्क्रीम असे चविष्ट, स्वादिष्ट, चमचमीत पदार्थ मिळणारी भरपूर ठिकाणे इथे तुम्हाला पदोपदी भेटतील. प्रत्येकाच्या आवडी निवडीसाठी असंख्य पर्याय आपल्याला खुणावत असतात. यातील बयाच ठिकाणांचा आस्वाद मी स्वतः घेतला आहे तर काही ठिकाणांची माहिती ऐकीव आहे. अशा काही ठिकाणांचा आढावा घेण्याचा हा एक अल्पसा प्रयत्न आहे. यातील काही ठिकाणे आजही दिमाखात चालू आहेत तर काही ठिकाणे बंद झाली आहेत. काही नवीन ठिकाणे चालू झाली असतील.

सांगलीच्या खाद्यभ्रमंतीची सुरवात पहाटे ३.३० ला स्टॅण्डवर मिळणा-या गरमागरम पोह्याने होते. आमच्या लहानपणी आनंद टॉकीज च्या बाजूला पाच पैशाला पांगळ्याची भजी मिळायची. त्यानंतर मारूती चौकात पंधरा पैशाला मिळणारी भजी. चेंबर ऑफ कॉमर्सच्या बाजूला मिळणारी भजी देखील चांगली असायची. हळद भवनमधील पोह्याबरोबर मिळणारा कट प्रसिद्ध होता. गणेश टाकीखाली मिळणा-या पोह्याला जगात कुठेही तोड नाही. याबाबत कोणत्याही खवय्याचे दुमत असणार नाही.

मिसळ हा आपला वीक पॉइंट. अनेक ठिकाणी वेगवेगळ्या चवीची मिसळ चाखायला मिळाली. याची सुरुवात कॉलेजच्या पहिल्यावर्षी तिखटजाळ कट-वड्याने झाली. गरमागरम, तेलाचा मोहवणारा तवंग, त्यात घातलेला मध्यम आकाराचा बटाटा वडा, त्यावर पसरलेल्या बारीक चिरलेल्या कांद्याचा थर बघून पोटात भूक उसळायला लागायची. वेटरने प्लेट टेबलावर ठेवताना नाकात शिरलेल्या वासाने दम निघायचा नाही. पहिल्यांदा कांदा बाजूला सारून तोंड भाजत असताना चमच्याने प्यायलेला कट घशातून खाली उतरताना मिळणा-या आनंदाची तुलना करणे अवघडच. त्यानंतर कट वडा भक्षण करताना जी हालत व्हायची ती विचारू नका. त्यावर बिन दुधाचा गरम चहा पिण्यात एक प्रकारचे थ्रील वाटायचे. अर्थात आर्थिक परिस्थितीमुळे हे दरवेळी शक्य व्हायचे नाही. पण त्याची ओढ मात्र कायम असायची. नंतर मिसळीने जीवनात प्रवेश केल्यावर मात्र कट वडा मागे पडला. आनंद टॉकीज समोरच्या हॉटेलातील तिखट मिसळ खूप फेमस होती. तेथील रस्सा उर्फ कट मला आवडायचा. तसं सांगलीत ब-याच ठिकाणी मिसळ मिळायची. थोड्याफार फरकाने सगळ्यांची चव एकसारखी असायची. मिसळीवरील प्रेमापोटी आम्ही जमेल तसा आनंद घ्यायचो. एका ठिकाणचा उल्लेख मात्र अपरिहार्य






आहे. मोठ्या मंडईच्या मागील भागातील धान्य बाजाराच्या सुरवातीला दिवसभर इतर पदार्थ, दुपारी व रात्री व्हेज, नॉन व्हेज जेवण असे एक हॉटेल होते. तेथे सकाळी गेल्यावर खास मिसळ मिळायची. त्यामध्ये फरसाण वगैरे इतर पदार्था बरोबर जो कट  मिळायचा तो म्हणजे काल शिल्लक राहिलेला मटणाचा रस्सा असायचा. दिवसभर रटरटलेल्या त्या रश्याची आठवण जरी आली तरी तोंडाला पाणी सुटतं. आम्ही कॉलेजला असताना सदासुख जवळील हॉटेलात मिळणारी आंबोळी, कढी-वडा खूप फेमस होता. मारूती रोडवरील एका हॉटेलातील मिसळ, साबुदाणा वडा छान असायचा. पेशवाई संतोषची उपवासाची मिसळ, जुन्या स्टेशन चौकातील मसाला डोसा, कॉंग्रेस कमिटी समोरील सॅंडविच ही काही आवडीची ठिकाणे होती. आनंद चौकात अलीच्या गाड्यावर मिळणारे मटण देखील काही काळ फेमस होते. चव काही फार चांगली नसायची, पण



रात्री उशिरापर्यंत जेवण मिळायचे म्हणून लोक तेथे उभे राहून जेवायचे. रात्री भटकंती करताना पटेल चौकातील भजी, आनंद समोरील दौलूमामाचा चहा, बालाजी चौकातील दुधाच्या गाड्यावर मिळणारी भरपूर साखर घातलेली दुधाची एक प्लेट जाड साय मला आवडायची. स्टेशन समोरच्या गल्लीत असणारे उत्तम घरगुती पद्धतीचे शाकाहारी जेवण मिळणारे हॉटेल  प्रसिद्ध होते. कॉंग्रेस कमिटीच्या अलिकडे सगळ्यात मोठे शाकाहारी हॉटेल निघाले. तेथे बहुतेक सगळे पदार्थ मिळायचे. तेथे फॅमिली व जेवणासाठी तळघरात स्वतंत्र व्यवस्था होती. एकदा मी तेथे सिझलर मागविले. त्यावेळी हा पदार्थ ब-याच जणांना माहीत नव्हता. सिझलरच्या धुराने, वासाने सगळं हॉटेल आमच्याकडे आम्ही काय मागवलं म्हणून पहात होतं. आमची कॉलर आपसूकच ताठ झाली. आजदेखील ते हॉटेल जोरात चालू आहे.

सांगलीच्या एस टी स्टॅन्डच्या बाहेर पहाटे साडेतीन, चारपासून एका गाड्यावर गरमागरम पोहे मिळायचे. रात्री उशिरापर्यंत गप्पा मारल्यावर ते पोहे खाण्यासाठी आम्ही जागे रहायचो. जुन्या स्टेशन चौकात फक्त रात्री एका गाड्यावर अंडा-वडा मिळायचा. तसेच स्टॅन्ड च्या बाहेर एका गाड्यावर बॉईल एग बुर्जी मिळायची. वखारभाग, प्रतापसिंह उद्याना बाहेर मिळणारी ओली, सुखी भेळ, पाणीपुरी, दही वडा यासारख्या खाद्यपदार्थांनी असंख्याना भुरळ घातली आहे. वखारभागातील प्रसिद्ध भेळेच्या बाजूला मिळणारी पावभाजी अल्पावधीत खूप लोकप्रिय झाली.

सांगलीमध्ये जेवायला जाण्याची ठिकाणे बरीच होती व आहेत. त्यावेळी सहकुटुंब नॉन व्हेज जेवायला जाण्यासारखे एकमेव ठिकाण म्हणजे मार्केट यार्डच्या गेट शेजारचे हॉटेल होते. चांदणी चौकात एकदम घरगुती मटणाची सोय नव्याने झाल्याचे कळल्याने मी व मित्र तेथे गेलो. त्याचा मालक  जैन तर त्याची पत्नी मुस्लिम जी खास आपल्या पद्धतीचे जेवण करायची. एका खोलीत गोल टेबल, त्याच्या भोवती सात, आठ स्टूल्स ठेवलेली. चव वेगळी, पण बरी होती. हळु हळु हे ठिकाण चांगलेच फेमस झाले. जेवायचा नंबर येण्यासाठी खूप वाट पहावी लागायची. त्याच्या अलीकडे तळघरात एक हॉटेल चालू झाले. चव ठीक होती. गर्दी खूप असायची. ते फारकाळ चालले नाही. सिव्हिल हॉस्पिटल शेजारी तळघरात आमच्या एका मित्राने हॉटेल चालू केले. चव बरी असायची. तेथे मिळणारा पांढरा रस्सा खूप पॉप्युलर होता. मिरजेला स्टेशन रोडवर एका मुस्लिम माणसाने माडीवर हॉटेल चालू केले. वेगळ्या चवीने ते बराच काळ चांगले चालले.

आनंदच्या मागे असणारे हॉटेल मटणासाठी खूप फेमस होते. ते आवडले नाही. म्हणजे चव ठीक होती, पण मोजक्याच प्रमाणात असणा-या पदार्थांमुळे पोट काही भरायचे नाही. एक्स्ट्रा घेणे परवडणारे नव्हते. मारूती रोडवर एक प्रसिद्ध छोटी खानावळ होती. तेथील वातावरण पाहून पुन्हा तेथे काही जाणे झाले नाही. जवळ पैलवानची खानावळ होती. चव काही आवडली नाही. त्यानंतर मंडईतील हॉटेलात मित्र घेऊन गेला. ते गुजराथी, मारवाडी तसेच अनेक व्यापायांचे खूप आवडते ठिकाण होते. चव सोसोच, पण व्यापारी वस्तीत असल्याने आणि मटण दिवसभर कधीही मिळत असल्यामुळे खूप जोरात चालायचे. क्वांटिटी म्हणजे देवाला नैवेद्य दाखवतात तेवढीच असायची. त्यामुळे ते मला कधी आवडलेच नाही. मग एक मित्र भेटला. त्याला देखील माझ्याप्रमाणेच चविष्ट, स्वादिष्ट, चमचमीत खाण्याची आवड होती. अर्थात तो माझ्या इतका खादाड


नव्हता. त्याचं म्हणणं असायचं, जगात दोनच प्रकारची जेवणं असतात एक म्हणजे चांगलं जेवण आणि दुसरं शाकाहारी जेवण. खाण्याची नवनवीन ठिकाणं शोधणे, वेगवेगळे पदार्थ मर्यादित प्रमाणात खाण्यासाठी कोठेही जायला नेहमी तत्पर असायचा. आमचा शोध सुरू झाला. पटेल चौकाजवळील बोळातील हॉटेलचे नाव ऐकून आम्ही गेलो. नंतर रॉकेलं टाकीकडे जायला वळल्यावर एक छोटी खानावळ. जुन्या स्टेशन समोर तसेच त्याच्यामागे अशी भटकंती चालू होतीच. सांगलीत मार्टीन्स नावाचे अत्याधुनिक पॉश हॉटेल चालू झाले. सिनेमात असायचे तसे मंद लाईट्स, दर्जेदार फर्निचर, स्वच्छ, कडक इस्त्रीचे कपडे घातलेले आदबशीर वेटर्स, पार्श्वभूमीवर संगीत असा थाट होता. येथे जाणे हा त्या काळातील तरुणाईचा स्टेटस सिम्बॉल होता. अगोदर वर्णन केलेल्या ठिकाणांचे स्वरूप खानावळीसारखे होते. पण मार्टीन्स ची शान काही वेगळीच होती. खाण्यापेक्षा इथे पिणे, गप्पा, मोठी स्वप्ने पहात निवांत घालवलेला वेळ याला जास्त महत्व होतं. बरीच वर्षे छान चाललेले हॉटेल अचानक बंद झाले. नंतर सांगलीत बरीच चांगली हॉटेलं झाली, पण मार्टीन्स सारखी लोकप्रियता, प्रतिष्ठा कोणालाही मिळवता आली नाही.











ॲड. श्री. मयुरेश दळवी
विधी तज्ञ

सांगली

80876 86323
98223 42983

# महिला अधिकार व कायदे

स्वातंत्र्यानंतर प्रजासत्ताक भारताच्या राज्यघटनेने महिलांचा समानतेचा मूलभूत हक्क मान्य केला कायदा हा जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यात तो महत्त्वाचा ठरतो. हे सत्य असले तरी विषमता, सामाजिक परिस्थिती, आर्थिक परिस्थिती, पुरुषप्रधानता, पितृसत्ताक पद्धती, जातिभेद, वर्णद्वेष, धार्मिक ताणतणाव, मानसिकता अशा कित्येक कारणांनी घटनेने दिलेली समानता प्रत्यक्षात यायला मात्र अनंत अडचणी निर्माण होतात. बनवलेले कायदे साध्या-सोप्या शब्दांत विविध माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला हवेत. समाजातल्या प्रत्येक महिलेला तिचे समाजातील महत्त्व, अधिकार आणि हक्क यांची माहिती असायला हवी. किंबहुना त्यांना काही अडचणी निर्माण झाल्यास त्या त्यांनी या कायद्याच्या आधार सोडवायला हव्यात.



१) महिलांना कुटुंबात होणाया हिंसाचारापासून संरक्षण देण्यासाठी कायदा करावा, म्हणून हा ठोस व निर्णायक कायदा अस्तित्वात आला. कुठल्याही स्त्रीचा प्रत्यक्ष छळ, मारहाण, धमकी, शिवीगाळ तसेच लैंगिक शोषण, तोंडी किंवा शाब्दिक छळ, भावनात्मक छळ, मानसिक छळ, आर्थिक छळ या सर्वांचा समावेश यात होतो. कोणत्याही पीडित स्त्रीला राज्य सरकार नियुक्त संरक्षण अधिकारी, पोलीस अधिकारी, सेवा देणारी पंजीकृत संस्था यांची मदत होईल. तशा प्रकारची तरतूद कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५ ह्या कायद्याअंतर्गत झाली आहे.

२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरूपण (प्रतिषेध) अधिनियम, १९८६ ह्या कायद्यामध्ये अश्लिल आणि मानहानिकारक स्त्रियांचे प्रदर्शन घडविणाया जाहिराती, प्रकाशन, लिखाण, पेंटींग, चित्रकला, सिनेमे किंवा इतर कोणत्याही प्रकारे स्त्रियांचे अश्लिल प्रदर्शन प्रतिबंध करणारा हा कायदा आहे. कलम ६ नुसार व कलम ७ नुसार, कायद्याचा भंग करणाया सर्व जबाबदार व्यक्ती इत्यादी वर कारवाई होऊ शकते.



३) हुंडा प्रतिबंधक कायदा नुसार हुंडा देणे आणि घेणे हा कायद्याने गुन्हा ठरविण्यात आला आहे . हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ च्या कलम ३ अन्वये हुंडा देण्याबद्दल किंवा घेण्याबद्दल कमीत कमी ५ वर्षे इतक्या मुदतीची कारावासाची आणि कमीत कमी रुपये पंधरा हजार अथवा अशा हुंडयाच्या मुल्याइतकी रक्कम यापैकी जी रक्कम जास्त असेल इतक्या रकमेची दंडाची शिक्षा करण्याची तरतूद आहे. राज्यात २६ नोव्हेंबर हा दिवस हुंडाबंदी दिन म्हणून साजरा केला जातो.

४) समान काम समान दाम या तत्त्वाच्या आधारावरच हा समान वेतन कायदा १९७६ मध्ये मंजूर करण्यात आला. कोणत्याही समान कामासाठी स्त्री आणि पुरुषांना समान वेतन देणे ही कंपनीच्या प्रमुखाची जबाबदारी

आहे तसेच भरती किंवा बढती करताना होणाया भेदभावास प्रतिबंध केला आहे. कंपनीच्या प्रमुखाने समान काम समान वेतन कायद्याचे पालन करणे बंधनकारक आहे.

५) कोणतेही शासकीय कार्यालय, कार्यालयाची शाखा, संस्था, खासगी क्षेत्रातील कार्यालये, संस्था, विश्वस्त संस्था, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, मनोरंजन केंद्रे, कारखाने, दवाखाने अशा सर्व प्रकारच्या कार्यालयांना कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा २०१३ हा कायदा लागू आहे. या कर्तव्यांमधे कसूर करणा-या कार्यालय प्रमुखांना दंड होऊ शकतो, कार्यालयाची, संस्थेची कायदेशीर मान्यता रद्द होऊ शकते. याबाबत विशाखा मार्गदर्शक तत्त्वे ही भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने स्त्रियांचा कामाच्या ठिकाणी होणाया लैंगिक छळाच्या अनुषंगाने घालून दिलेली आहेत.

- नोकरी वा व्यवसायाच्या ठिकाणी महिलांची लैंगिक छळवणूक होऊ न देण्याची जबाबदारी ही मालकाची अथवा संबंधित अधिकारी वा व्यक्तीची असेल. ▌जर लैंगिक छळवणुकीची घटना ही फौजदारी गुन्हा होत असेल, तर संबंधित अधिकायांनी योग्य त्या ठिकाणी याची तक्रार तर नोंदवावीच ; पण त्याचबरोबर पीडित महिलेस सर्व सुरक्षा पुरवावी.
- पीडित महिलेस तिच्या इच्छित ठिकाणी बदली करून द्यावी व संबंधित आरोपी कर्मचायाविरुद्ध नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई सुरू करावी.
- सर्व सरकारी, निमसरकारी, खाजगी तसेच सार्वजनिक क्षेत्रातील कार्यालयात महिलांच्या होणाया लैंगिक शोषणाची तक्रार ऐकून निवाडा देण्यासाठी एक तक्रार निवारण मंच वा समिती असावी .

६) मातृत्व लाभ कायदा १९६१ :- भारतीय महिला जी नोकरी करत आहे, तिला तिच्या बाळंतपणाच्या काळात कामावरून सक्तीची रजा मिळावी. आर्थिक साहाय्यही मिळावे, असा या कायद्याचा उद्देश आहे. नव्या २०१७ मधील दुरुस्ती नुसार प्रसूती रजा १२ आठ्वड्यावरून २६ आठवड्यापर्यंत वाढविली . यानुसार २६ आठवड्यांच्या रजेचा पगार संबंधित महिलेला देणे कंपनीला बंधनकारक आहे .

७) इतर हक्क आणि अधिकार :- खालील हक्क आणि अधिकार कायद्यानुसार महिलांना प्रदान केले आहेत.

- ओळख न घेण्याचा अधिकार - स्त्रीच्या गोपनीयतेचे रक्षण करण्याचा अधिकार आपल्या कायद्यात अंतर्भूत आहे. जर एखादी महिला लैंगिक छळाची शिकार झाली असेल तर ती एकटीच जिल्हा दंडाधिकायांसमोर तिचे म्हणणे नोंदवू शकते.
- महिलांच्या अटकेसंबंधी - महिलांना फक्त महिला पोलिस सूयोर्दयानंतर आणि सूर्यास्तापूर्वी अटक करू शकतात . कुटुंबाच्या सदस्याच्या उपस्थितीत व योग्य कारण असेल तरच स्त्रीला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी बोलावता येते. स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्येच ठेवता येते.
- झिरो एफआयआर करण्याचा अधिकार - दिल्लीमध्ये २०१२ साली निर्भया सामूहिक बलात्कार प्रकरण घडलं आणि त्यानंतर महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा ऐरणीवर आला. झिरो एफआयआरनुसार, ज्या ठिकाणी गुन्हा किंवा अपघात घडला असेल तिथून जवळ असलेल्या कोणत्याही पोलीस स्टेशनमधे प्राथमिक तपास अहवाल अर्ज (एफआयआर) दाखल करता येतो. त्यानंतर तो ज्या पोलीस स्टेशनच्या हद्दीत येतो तिथे पाठवला जातो. त्यामुळे घटनेवर त्वरीत कारवाई करणं शक्य होतं.

८) महिला आयोग :- राष्ट्रीय महिला आयोग ही भारताच्या संविधानातील तरतुदीनुसार भारत सरकारने १९९२ मध्ये स्थापन केलेली वैधानिक संस्था आहे. १९९० च्या राष्ट्रीय महिला आयोग कायद्याद्वारे तिची स्थापना करण्यात आली . केंद्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर १९९३ मध्ये केली. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना २५ जानेवारी, १९९३ रोजी झाली. आयोगाच्या कार्यामध्ये महिलांसाठी घटनेतील तसेच इतर कायद्यातील उपलब्ध सुरक्षा उपयांची तपासणी व परीक्षण करणे. तसेच वरील तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकारला शिफारशी करणे तसेच तक्रारदार महिलांना अधिकारापासून वंचित राहू नये म्हणून सक्षम अधिकायाच्या निदर्शनास महिला आयोग काम करत असते. भेदभाव व महिलांकरिता अत्याचारांमुळे निर्माण होणाया समस्या यावरील उपाययोजनेवर येणाया अडथळ्यांवर शिफारशी करणे, महिलांच्या सामाजिक, आर्थिक विकासासाठी योजनानिर्मित्ती प्रक्रियेत सहभागी होणे आणि सल्ला देणे हे आयोगाचे काम आहे.



सौ.देवकी विशाल कामत

## व्यथा

भल्या पहाटे उठून घराबाहेर पडायचं,
संसार चलवण्या साठी दिवसभर राबायच.

राबराब राबयच तक्रारी वीना,
गरीबांची बाजु कुणी, समजुन का घेईना

विजेची तक्रार डोई घामाची धार,
मूकपणे सोसतात संसाराचा भार.

शहरातल्या लोकांना सोई अन सुविधा,
खेड्यातल्या लोकांची झाली मनस्थिती द्विधा.

मूकपणे दोघे निभावतायेत साथ,
शेतकयाच्या संसाराला जनावरांचा हात.

आठवड्याच्या सुरवातीला शहाराकडे यायचं,
सुट्टीच्या दिवशी ओढीनं घराकडे वळायचं.

मैलोन मैल फकत पाण्यासाठी चालायचं,
मिळेल का कधी ह्यांना पाणी पुरेसे प्यायच.

सततच्या दुष्काळानं भुमी गेली तापून,
म्हणुन नैसर्गिक संपत्तीचा वापर करा जपुन.

## आयुष्य खुप सुंदर वाटतं

बंगल्यात राहणाया श्रीमंता पेक्षा
झोपडीत राहणाया गरीबा कडे पहावं
आयुष्य खूप सुंदर वाटतं

नशिबाची चाकरी करण्यापेक्षा
कर्तृत्वाला आपल्या हाताखाली बाळगावं
आयुष्य खुप सुंदर वाटतं

भविष्याचे चित्र काढण्यापेक्षा
वृतमनातले चित्र रेखाटावे
आयुष्य खुप सुंदर वाटतं

हरल्यावर पशच्याताप करण्यापेक्षा
प्रेमाच्या खांद्यावर रडून पहावं
आयुष्य खुप सुंदर वाटतं

आपल्याला कोण हवंय यापेक्षा
आपण कोणाला हवंय हे पहावं
आयुष्य खुप सुंदर वाटतं

समुद्रातल्या पाण्याचे प्रमाण सांगता येत नाही
आकाशातले तारे मोजता येत नाही
म्हणूनच थोडक्यात नेहमी समाधान मानावं
आयुष्य खुप सुंदर वाटतं








**श्री चेतन कोटणीस**
[BE Auto.]
विश्रामबाग, सांगली
70382 01047

# चार चाकी गाडी घेताना

रोजच्या आपल्या जीवनात घरी चार चाकी असणे ही आता चैन नसून गरज बनली आहे. आज मार्केट मध्ये अनेक कंपनीच्या नवीन तंत्रज्ञान असलेल्या गाड्या उपलब्ध आहेत. यामुळे आपण गाडी घेताना कोणत्या कंपनीची, नवी अथवा जुनी या विचारात पडतो. यासाठी खालील मुद्दे विचारात घेणे गरजेचे आहे.



१. आपण जर पहिल्यांदाच गाडी घेत असू तर शक्यतो जुनी आणि चांगल्या कंडीशन मध्ये असलेली गाडी घ्यावी. गाडी पूर्ण व्यवस्थित चालवता आली की मग आपली गाडी बदलून चांगली जुनी किंवा नवीन गाडी घेणे.

२. जुन्या गाडीवर वार्षिक घट हि नवीन गाडीच्या तुलनेत कमी असते.

३. गाडीचा वापर किती जण करणार आहेत त्यानुसार ५ ,६, ७ सीटचे मॉडेल ठरवणे.

४. साधारण वार्षिक किलोमिटर (रनिंग) होणार त्यानुसार पेट्रोल किंवा सीनजी निवड करावी. सध्या सगळ्या कंपन्यांनी डिझेल गाड्या बनविणे बंद केले आहे. त्यामुळे पेट्रोल, सीएनजी, व इलेक्ट्रिक असे पर्याय आहेत.

५. होणारे किलोमिटर १० ते १५ हजार वार्षिक असेल तर पेट्रोल व जास्त होणार असेल तर सीएनजी निवड करावी.

६. इलेक्ट्रिक गाड्यांचे अजूनही पूर्ण संशोधन झालेले नाही. चार्जिंग पॉइंट्स कमी आहेत. रेटेड किलोमिटर हि कमी येते आहे.

७. गाडीची वर्तमान मार्केट किंमत आणि ५ ते ७ वर्षानंतर रिसेल किंमत विचारात घेणे.

८. आपण घेत असलेल्या गाडीत किती आणि कोणते फीचर्स आहेत आणि त्यांचा वापर होणार आहे का याचा विचार करावा. अधिक माहिती व काही शंका असेल तर आपण मला संपर्क करू शकता.






# सभासद

| | |
|---|---|
| विकास श्रीकांत कोटणीस | . ९७६४९०१७८८ |
| स्नेहल शिरीष माणागांवकर | . ९६१९८३२५९४ |
| शिरीष माणागांवकर | . ८६९१९६४१२१ |
| विनय दत्ताराम भट | . ९८२२०२१९६६ |
| प्रमोद बाळकृष्ण महाडदळकर | . ९५१८७७१०३५ |
| आदित्य रविंद्र जप्तीवाले | . ९४०५२८४९६२ |
| हर्षल दीपक पत्की | . ८७९३२६८९३८ |
| उज्जवल विष्णूपंत तिळवे | . ९८२२३८३९९९ |
| दिलीप वसंतराव वैद्य | . ९४२३५६५७३७ |
| अनिल विठ्ठल सांकव गोवेकर | . ८२३७१८२००६ |
| आशिष चंद्रकांत जप्तीवाले | . ९२२३५५२७५० |
| भालचंद्र सुरेश तिळवे | . ७८७५७१४२७२ |
| शाम वसंतराव वैद्य | . ७५८८८८०२२२ |
| शैलेश रविकांत दाणी | . ९९००२२९२८५ |
| मनिष माणिकराव देशपांडे | . ७५८८३६५२५९ |
| डॉ. उमेश दिवाकर शेणाई | . ९८८१४५९५२८ |
| डॉ. मंदार वसंत करंजवडेकर | . ९८२२३४९०८३ |
| सौ. मैथिली मंदार मोकाशी | . ९०२८७३२४३२ |
| मयुरेश रामचंद्र मडूरकर | . ९९२३१३१९४८ |
| अजिंक्य प्रकाश कोगेकर | . ९४२३२६७८९१ |
| विनोद गजानन सुखटणकर | . ९८३४६०५७४२ |
| डॉ. विवेक वसंत वैद्य | . ९४२२५२५३०५ |
| डॉ. सुभाष गजानन पत्की | . ९२७२३२४०९६ |
| मंगेश माधव मंत्री | . ९३२५४०३२३४ |
| डॉ. प्रविण अशोक बेकनाळकर | . ९८९०९५५२४० |
| रणजित रमेश वेंगुर्लेकर | . ७७४४९६५३५३ |
| डॉ. मंगेश रामचंद्र मंत्री | . ९७३०४५०६०४ |
| संदेश दत्तात्रय पतकी | . ९८९०८५५१५३ |
| दिनेश मनोहर दळवी | . ९८२२७४५२६९ |
| संजय शामराव रेगे | . ९८८१०७२२७७ |
| संजिव दत्तात्रय वालावलकर . | . ९८२२४०७९५८ |
| अविनाश उध्दवराव जप्तीवाले | . ८१४९९९३७११ |
| विवेक वसंतराव द्ळवी | . ९६३७९०७९५० |
| सतेज कृष्णाजी दळवी | . ९८२२५ ०७६३८ |
| दीपक अनंत सराफ | . ७२७६५५००८१ |
| योगेश रविंद्र बोरकर | . ९८९००५१७३४ |
| ज्ञानेश दिलिप वैद्य | . ८९७५३८७५०० |
| दिलीप वैद्य | . ९४२३५६५७३७ |
| अमोल जयवंत बोरकर | . ९९६०१३२८८० |
| मयुरेश दीपक दळवी | . ८०८७६८६३२३ |
| संदीप दत्तात्रय दळवी | . ९४०३७८०१०० |
| शंकर वसंत नाबर | . ८३९०३९२०५५ |
| आकाश राम वर्दे | . ९११२६९६८७५ |
| राम दीनानाथ वर्दे | . ९२०९३०३४११ |
| मुकुंद सदाशिव साहोत्रे | . ७५५९४२१०३६ |
| हेमंत सदाशिव साहोत्रे | . ९८२२८६५६८३ |
| घनःश्याम सदाशिव साहोत्रे | . ९८९०७०४८५६ |
| अभय श्रीकांत बोरकर | .९९७५९१८८१८ |
| स्वाती रमाकांत सोहनी | . ७०५८९८३६५० |
| राहूल प्रकाश देसाई | . ९०२८४७४५०८ |
| सौरभ सुरेश बक्षी | . ९८९०६३८०८८ |
| महेश विठ्ठल वैद्य . | . ९८२२०६९६४४ |
| तृप्ती प्रदिप दळवी . | . ८०८७०१०९३५ |
| रविंद्र चंद्रकांत बेकनाळकर | . ९४२११२४३५६ |
| नितीन अरविंद हरळीकर | . ८८०६७७५७७७ |
| अनुप मोहनराव धूमे | . ०९९७०८९७१७१ |
| विजय मनोहर कामत | . ७४११५००९९५ |
| रमेश रामचंद्र साखवळकर | . ९८२३३७७८७३ |
| विजय वसंत तोरगलकर | . ९८५००१२८३० |
| संतोष रामचंद्र अरविंदेकर | . ८३२९४९०४६० |

# सभासद

| | |
|---|---|
| गायत्री गणपती शानभाग | . ९४२३०१७९०९ |
| नरेंद्र चंद्रकांत सामंत | . ८६९८२७८१०२ |
| प्रमोद गणपतराव कुकळ्येकर | . ९८९०५२१७३५ |
| सौमित्र कमलनाथ प्रभू | . ७६२०३७७३८० |
| ्दत्तात्रय गणपत कुकळ्येकर | . ९९२२४७४२५५ |
| वैदेही विष्णू घोलकर | . ९६८९७३४५७९ |
| पंकज प्रमोद कुकळ्येकर | . ९६०४६१५८५७ |
| श्रीपाद श्रीराम पाटगांवकर | . ७७२१८७६४१५ |
| विनायक विठ्ठल सहोत्रे | . ९६८९९५८१३० |
| प्रसाद विनायक पत्की | . ९३४१५६८०८१ |
| उध्दव अरूण दळवी | . ९२२५८२०२६० |
| विनायक प्रल्हाद राजाध्यक्ष | . ९५०३०९४३६३ |
| अनिल गोविंद जप्तीवाले, डिग्रज | . ७२४९६५१८२७ |
| नरसिंह दतात्रय प्रभू, सांगली | . ९४०३०४६०७२ |
| विवेक वाकडे, सांगली, | . ९६५७८५८५०८ |
| सौ प्रज्ञा प्रदीप वेंगुर्लेकर, इस्लामपूर | . ९४२२१५८७३६ |
| दिलिप नारायण सामंत, सांगली | . ९३२५१७११७७ |
| श्रीम. शारदा अश्विन दळवी, मिरज | . ९३२५६६५६०१ |
| अश्विन रामराव दळवी, मिरज | . ९३२५६६५६०० |
| स्नेहा सुनिल ठाकुर, सांगली | . ९४०३४०३६२९ |
| सुषमा प्रभूकेळूसकर, सांगली | . ८८०५३३५२७७ |
| श्रीम. शुभांगी विजय नाईक मिरज | . ९९६०८४९६४५ |
| मनोहर कोटणिस, सांगली | . ९३७०४७८३१३ |
| श्रीम. मीरा देशपांडे, उगार | . ९००१६१६०६६ |
| सौ, रुपाली सांमंत, सांगली | . ९३२५१७११७७ |
| सौ. अरुणा रमेश साखवळकर सांगली | . ९८२२३७६९९९ |
| ऋशिकेश बडणीकर, सांगली | . ९८२२०८७२८४ |
| श्रीनिवास सुधीर बडणीकर सांगली | . ९३२५०१९२४५ |
| सुनिल बडणीकर, सांगली | . ८४८३८३०२३१ |
| शिरीष भंडारे, सांगली | . ९८९०४६७४६७ |
| प्रतिक विकास भट | . ९७६६९५९५२७ |
| नितिन बोरकर सांगली | . ९०२८४३५८३६ |



# भावपूर्ण श्रध्दांजली

*कोणतीही व्यक्ती जेव्हा ह्या जगाचा निरोप घेते तेव्हा त्यांच्या परिजनांना खूप दुःख होते. त्यांच्यासोबत घालवलेले क्षण आठवून आपल्याला वाईट वाटते. भावना केवळ अश्रूंमधूनच नव्हे तर शब्दांतूनही व्यक्त व्हायला पाहिजेत. तुमच्या जीवनातील तुमच्यापासून कायमच्या विभक्त झालेल्या व्यक्तींच्या स्मरणार्थ भावना व्यक्त करायला पाहिजेत. आपल्या समाजाच्या कोणत्याही सभासदांच्या नातेवाईकांचे निधन झाले तर आपल्या समाजाला दुःख होते. ह्याच भावनेतून त्यांच्याबद्दलची आत्मीयता व्यक्त करणे हे समाज मंडळाचे कर्तव्य आहे. आपण नियतीला टाळू शकत नाहीत, परंतु त्यांच्या प्रियजनांचे भावनिक शब्द सुमनांनी सांत्वन करुन दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण करु.*



**कै. अंजली चंद्रकांत सामंत**

श्रीम. अंजली चंद्रकांत सामंत यांचे २२ नोव्हेंबर २०२३ रोजी निधन झाले. सारस्वत समाज विकास मंडळ, सांगलीचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. समाजासाठी कार्य करणे, सर्वांना घेऊन मिळून मिसळून काम करत राहाणे हा त्यांचा स्वभाग होता. समाजाचे कर्यक्रम घेणेसाठी त्यांचे घराचे टेरेस ही हक्काची जागा आहे असे ते नेहमी सांगत असत. विविध कार्यक्रम करण्यात त्यांचा पुऱाकार नेहमी असायच्या.

त्या उत्तम गृहिणी होत्याच, तसेच स्वतःचे हेल्थ रिसॉर्ट व हॉटेल त्या सांभाळत होत्या. .



**कै. सुचित्रा सुरेश तिळवे**

श्रीमती सुचित्रा सुरेश तिळवे यांचे वयाच्या ७५ वर्षी दि ११ फेब्रुवारी २०२४ रोजी निधन झाले. आपल्या समाजाचे सभासद श्री भालचंद्र तिळवे यांच्या त्या मातोश्री होत्या. त्यांचे मूळ गाव बेळगाव होते. जुनी मॅट्रिक पर्यंत त्यांचे शिक्षण झाले होते.

त्या गृहीणी होत्या. अध्यात्मिक आवड त्यांनी जोपासली होती. त्यांच्या पश्चात १ मुलगा, १ मुलगी, सून व नातवंडे असा परिवार आहे



**कै. सुषमा सुभाष वेंगुर्लेकर**

आपल्या समाजाचे सभासद सौ. मानसी विनायक राजाध्यक्ष यांच्या मातोश्री श्रीमती सुषमा सुभाष वेंगुर्लेकर, राहणार सांगली यांचे दि ४ फेब्रुवारी २०२४ रोजी वयाच्या ७७ वर्षी निधन झाले. मागील १२ वर्ष ते आपल्या मुलीकडे वास्तव्यास होत्या. याआधी रत्नागिरी जिल्यातील साखरपा येथे वास्तव्य होते. साखरपा येथे असताना त्यांनी युनिसेफच्या अंगणवाडी संचालिका म्हणून अनेक वर्ष काम केले. साखरपा येथे कबनुकर इंग्लिश मिडियम स्कुल सुरु करण्यामध्ये महत्वाचा वाटा उचलला होता. शाळेच्या सुरवातीच्या काळामध्ये संचालक मंडळात देखिल काम केले होते. सामाजिक भान चांगले असल्याने साखरपा येथे विविध सामाजिक संस्थांना मार्गदर्शन केले. त्यांच्या पश्चात त्यांच्या दोन मुली, जावई, नातवंड असा परिवार आहे.



**साधना दत्ताराम भट**

श्रीमती साधना दत्ताराम भट याना दिनांक १०/१०/२०२३ रोजी रहात्या घरीच देवाज्ञा झाली. मृत्यू समयी त्याचे वय ८९ वर्ष होते. प. पु आई कलावती देवीचा त्यांनी अनुग्रह घेतला होता व त्यानी घालुन दिलेली उपासना व नियम त्यानी शेवटपर्यंत जपले व सांभाळले. समाज्यातील अनेक जणांना त्यानी सद्गुरुच्या उपसनेचे ज्ञान दिले. आशा रितीनेपण सद् गुरुची सेवा करण्याची त्यांना संधी मिळाली

॥ संहतिः कार्यसाधिका ॥

# सारस्वत समाज विकास मंडळ

## सांगली


संपर्क

निशांत अपार्टमेंट, नागराज कॉलनी,

विश्रामबाग, सांगली - ४१६ ४१६

(महाराष्ट्र)

९१ ९७६४९०१७८८

९१ ८२०८३६६४६४

saraswatmandalsng.gmail.com


Visit us at

saraswatmandalsangli.org



Layout and design by - Cyberjurix (9503094363